**<u>सीएनआरक्र.एमएचडीएच०४०००१३१२०२५</u>**

**<u>नि.दि.मु.क्र. ०८/२०२५ मधील नि.क्र. ०५ वरील आदेश</u>**

यातील वादी याचे तर्फे विद्वान विधीज्ञ यांचा युक्तिवाद ऐकला. दावा तसेच नि.क्र.५ कडील प्रस्तुत अर्जाचे संपूर्णपणे अवलोकन केले. वादीतर्फे नि.क्र.३ सोबत दाखल केलेल्या कागदपत्रांचे काळजीपूर्वक अवलोकन केले. वादीच्या कथनाचा व अभिलेखावर दाखल कागदपत्रांचा सकृतदर्शनी विचार केला असता, यातील प्रतिवादी क्र. ३ हिस प्रस्तुत अर्जाबद्दलची नोटीस दिल्याने, पुढे मनाई हुकुम देण्याचा उद्देश विफल होईल अशी परिस्थिती दिसून येत नाही. प्रस्तुत अर्जाचेकामी वादीतर्फे करण्यात आलेल्या मागणीचा व अभिलेखावर दाखल केलेल्या दस्तऐवजांचा विचार करता यातील प्रतिवादी क्र. ३ हिचे प्रस्तुत अर्जाचे कामी म्हणणे ऐकून न घेता तिचे विरुध्द कोणताही एकतर्फा तुर्तातूर्त मनाईचा आदेश पारित करणे न्यायोचित होणार नाही, असे माझे मत आहे. प्रतिवादी क्र. ३ हिचे प्रस्तुत अर्जाचे कामी म्हणणे घेऊनच पुढील योग्य तो आदेश करणे न्यायाच्या दृष्टीने उचित व हितावह ठरणारे आहे. याकारणास्तव, खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे :–

**<u>– आदेश –</u>**

१) यातील वादी हे मागत असलेली तुर्तातूर्त मनाईची दाद

त्यांना का देणेत येऊ नये याकरिता प्रतिवादी क्र. ३ हिस कारणे दाखवा नोटीस काढणेत यावी.

२) यातील वादीने मागितले असल्यास, तात्काळ आदेशिका शुल्क व स्वतंत्र बेलिफ मंजूर करणेत येत आहे.

३) नोटीस परतावा दिनांक २७/०२/२०२५.

ADITYA GHANSHAM NAIK

Digitally signed by ADITYA GHANSHAM NAIK
Date: 2025.02.21 17:30:28 +0530

स्थळ : दोंडाईचा
दिनांक : २१/०२/२०२५

(आदित्य घ. नाईक)
दिवाणी न्यायाधीश क–स्तर,
दोंडाईचा

**प्रमाणपत्र**

मी, खात्रीपूर्वक कथन करतो की, पी.डी.एफ. फाईल मधील आदेशाचा/न्यायनिर्णयाचा संपूर्ण मजकूर हा मूळ आदेशाप्रमाणे/न्यायनिर्णयाप्रमाणे शब्दशः, तंतोतंत व बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नांव | – | गणेश साईनाथ अहिरे (श्रेणी–३) |
| न्यायालयाचे नांव | – | दिवाणी न्यायालय क.स्तर, दोंडाईचा |
| दिनांक | – | २१/०२/२०२५ |

सही/–
लघुलेखक–ग्रेड–३